# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. मनपा/आयुक्त/ ६२/२०२२-२३
आयुक्त यांचे कार्यालय
दि. १२/०९/२०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**आदेश**

विषय:- प्रशासक कालावधीत नागरिकांच्या समस्या, तक्रारी निवारणा संदर्भात.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध नागरी समस्या, तक्रारीं संदर्भात अर्ज, निवेदन सादर करणेकामी शहरातील नागरिक, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आयुक्तांचे भेटीसाठी येत असतात. याकामी पूर्वपरवानगीशिवाय आयुक्तांच्या भेटीसाठी आठवड्यातील मंगळवार व गुरुवार हे दिवस निश्चित करण्यात आलेले आहे.

सध्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सदस्यांचा कालावधी दि.२७ ऑगस्ट रोजी संपुष्टात आला असून शहरात प्रशासकीय राजवट लागू झालेली आहे. या कालावधी दरम्यान तक्रारी, समस्या, अर्ज, निवेदने घेऊन येणाऱ्या नागरिक, कार्यकर्ते यांची संख्या मोठी आहे. या सर्वांना वेळ देवून त्यांच्या तक्रारी, समस्या ऐकून घेऊन त्यावर वेळेत नियमानुसार कार्यवाही करणे प्रशासनास क्रम:प्राप्त आहे.

सबब, आयुक्तांचे भेटीचे वार वगळता आठवड्यातील सोमवार व बुधवार या दिवशी श्री.अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त (१) यांनी नागरिकांच्या समस्या, तक्रारी ऐकून त्यावर नियमानुसार कार्यवाही करावी. तसेच प्रत्येक आठवड्यातील शुक्रवार व आयुक्तांचे अनुपस्थितीत मंगळवार व गुरुवार या दिवशी श्री. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त (२) यांनी नागरिक, कार्यकर्ते यांच्या समस्या, तक्रारी ऐकून त्यावर नियमानुसार कार्यवाही करावी.

तसेच या कालावधीत पालिका उप-आयुक्त, विभागप्रमुख, सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दैनंदिनरित्या तक्रारी, समस्या, अर्ज, निवेदन घेऊन येणारे नागरिक, कार्यकर्ते यांना वेळ देऊन त्यांचे प्रश्नांचे निराकरण करण्याची संपूर्ण कार्यवाही करावी.

करिता याद्वारे आदेशित करण्यात येत आहे.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त तथा प्रशासक**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१. अतिरिक्त आयुक्त (१)
२. अतिरिक्त आयुक्त (२)
३. विभागप्रमुख / खातेप्रमुख (सर्व)
४. स्थळप्रत.